# Transitional Curriculum Program for UG Students

2021-22 पासून NCISM द्वारे १५ दिवसीय Transitional curriculum नावाची संकल्पना प्रथम वर्ष बीएएमएस विद्यार्थ्यांसाठी राबवण्याची अंमलबजावणी करण्यात आली.या curriculum चे सलग हे तिसरे साल. ह्यावर्षी हा उपक्रम राबवण्याची व सांभाळण्याची धुरा ही रचना शरीर विभागावर सोपवण्यात आली होती. नीट परीक्षार्थी ते प्रथम वर्ष वैद्यकीय पदवी पूर्व विद्यार्थी यातले अंतर कमी करणे तसेच ह्या दरम्यान अनेक चढाओढींचा,  आव्हानांचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागतो. तसेच विविध प्रांतातून,विविध कौटुंबिक सामाजिक वातावरणातून विद्यार्थी एका महाविद्यालयात प्रवेशित होतात.अशा वेळेला त्यांना महाविद्यालयातून आधाराची गरज असते .आपल्या जबाबदारीची जाणीव समजून घेण्यासाठी, एकीय व आपुलकीची भावना तसेच आपणही पुढे याच महाविद्यालयाचा भाग असणार आहोत;या उद्देशाने यावर्षी दिनांक ८ मार्च २०२३ ते १५ मार्च २०२३ या दरम्यान हा Transitional curriculum चा उपक्रम घेण्यात आला.

त्यामध्ये शास्त्राची ओळख, शास्त्राद्वारे त्यांचा विकास, व्यक्तिमत्वाची जडणघडण महाविद्यालयाचा पुरेसा परिचय तसेच त्याच्याशी संलग्नित असणाऱ्या रुग्णालयाचा परिचय, future scope in ayurved व ह्या प्रवासात अभ्यास कसा करावा या पैलूंचा विचार करून या अंतर्गत एनसीआयएसएम गाईडलाईन्स नुसार व्याख्याने आयोजित केली गेली होती. यासाठी महाविद्यालयातील तद तद विषयातील तज्ञांनी तसेच इतर मानद तज्ञ व्यक्तींनी या उपक्रमात व्याख्याते म्हणून आपली उपस्थिती दर्शवली.

आयुर्वेदशास्त्र व त्याची संपूर्ण ग्रंथसंपदा ही संस्कृत भाषेत उपलब्ध आहे.मूळ संहिता ग्रंथ अध्ययनात मुलांना पारंगत करणे या अनुषंगाने संस्कृत भाषेची मौखिक ओळख व अल्प परिचय सहज व सोप्या पद्धतीने अवगत करून देण्यासाठी पंधरा दिवस रोज □वदत् संस्कृतम् □ व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ह्यासाठी हेमा डोळे व प्रणव गोखले यांनी आपले योगदान दिले.नमो नमः पासून ते विभक्ती लटलकारादि (भूत,भविष्य,वर्तमान) धातू रूपे,ककारादींचा अल्प परिचय करून देऊन या भाषेविषयी भितीवर मात करून त्याविषयी रुची निर्माण करण्याचा उत्तम प्रयत्न केला . शास्त्राची ओळख व शास्त्राद्वारे विकास होण्याच्या दृष्टिकोनातून अनेक वैद्यांनी व्याख्याने देऊन मुलांना प्रोत्साहन दिले. वैद्य हरीश पाटणकरांनी केश आयुर्वेदावर मार्गदर्शन केले.आयुर्वेद हा पांच भौतिक सिद्धांताला स्वीकृत करतो कारण मनुष्य हा ही पांचभौतिक आहे व औषधी द्रव्य तसेच आहार हा ही पांचभौतीक आहे अशा या आयुर्वेदातील वैशिष्ट्यपूर्ण पांचभौतिक चिकित्सेचा परिचय वैद्य प्रशांत सुरू यांनी करून दिला. आयुर्वेदात ही स्पेशलाईज्ड चिकित्सक म्हणून मान्यता प्राप्त होऊ शकते आणि तसेच आयुर्वेद हा आत्ययिक चिकित्सेसाठी सक्षम आहे फक्त आपण आपल्या पंखात बळ भरून स्वतःला तयार करून सज्ज होण्याची गरज आहे असा मोलाचा संदेश व त्याचे प्रत्यक्ष प्रमाण रुग्णपत्रिकेद्वारे देऊन मुलांमध्ये शास्त्राविषयी दृढ विश्वास,आत्मीयता, प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य वैद्य त्रिलोक धोपेश्वरकर यांनी केले. संहिता ग्रंथ हे थेरॉटिकल नसून त्यातला प्रत्येक शब्द हा प्रॅक्टिकल इम्पॉरटन्स चा आहे असे हे बीज सुरुवातीपासूनच मुलांच्या मनामध्ये रोवण्याचे कार्य वैद्य स्वाती कुलकर्णी यांनी केले.प्रथम वर्षापासून संहिता अध्ययन,रुग्णालयात नित्य जाऊन रुग्णांची संवाद साधने तसेच नित्य फिजिशनच्या संपर्कात राहून आयुर्वेदीय निदान व त्याची यशस्वी चिकित्सा करून अनेक अवघड असणाऱ्या व्याधींची यशस्वी

चिकित्सा आपण हा या मार्गाचा अवलंब करून कशी करू शकतो याचे ज्ञान वैद्य श्रीरंग गलगली यांनी करवून दिले. आयुर्वेदाने वेदनाशमनासाठी दीर्घकाळ लागतो ह्या समाज रूढ म्हणीचे खंडन अग्निविद्ध कर्म चिकित्सेद्वारे उत्तमरित्या अल्पावधीत कसे केले जाऊ शकते याविषयी वैद्य चंद्रकुमार देशमुख यांनी मार्गदर्शन केले. आयुर्वेद हा फक्त भारतापूरता मर्यादित नसून या शास्त्राने आपले पंख इतर देशातही यशस्वीपणे पसरवले आहेत आणि ह्यासाठी गरज असते ती म्हणजे दृढनिश्चय, शास्त्रनिष्ठा व अथांग शास्त्र प्रेम ह्याची साक्षात प्रचिती विद्यार्थ्यांना आपले दिग्गज व्यक्तीमत्व वैद्यरत्न आदरणीय सुभाष रानडे यांनी करून दिली. आयुर्वेद फार्मसी सेटअप व अगदी दुसऱ्या वर्षापासून औषधे बनवून आपण स्वतःला व शास्त्राला सशक्त कसे करू शकतो तसेच नाडी विज्ञान शारीरातल्या छोट्या संकल्पनांनी आपण सहज सोप्या पद्धतीने चिकित्सा कशी करायची याविषयीचे मार्गदर्शन वैद्य लावगणकर यांनी केले .

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच सर्वांगीण विकास ,शारीरिक व मानसिक सशक्तिकरण या दृष्टीकोनातूनही अनेक व्याख्याने घेण्यात आली. योग व मेडिटेशन याद्वारे लाभणारे शारीरिक व मानसिक स्थैर्य या बाबी प्रात्यक्षिकेद्वारे वैद्य ज्योती राहाळकर मॅडम यांनी पटवून दिल्या. तसेच आहार विहार कसा ठेवावा यावरही मार्गदर्शन करण्यात . नरेंद्र नायडू यांनी आयुष्यात येणारा प्रत्येक प्रसंगाचा आपण धीराने सामना केला पाहिजे तसेच आयुष्य म्हटल्यावर चढ-उतार हा त्याचा अविभाज्य घटक आहे.ह्या प्रवासात आपण प्रत्येक क्षण हा आनंदाने जगत मार्ग काढत मार्गक्रमण कसे करावे याचे अनमोल मार्गदर्शन केले.

तसेच गोल सेटिंग लाईफ लाँग लर्निंग स्ट्रॅटजिज अशा अनेक विषयांवर व्याख्याने झाली. अभ्यास कसा करावा व लास्ट मिनिट तणाव टाळण्यासाठी सिनीयर विद्यार्थ्यांना बोलाविण्यात आले होते व त्यांनी ह्या विद्यार्थ्यांनी उत्तम दिशादर्शक मार्गदर्शन केले तसेच रुग्णालय व महाविद्यालयाची सुव्यवस्थितपणे ओळख करून देण्यात आली. तसेच नित्य विद्यार्थ्यांची संवाद साधून त्यांच्या प्रत्येक अडीअडचणी जाणून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्याचे मोलाचे काम वैद्य सरोज पाटील व वैद्य सारिका चोपडे नित्य करत होत्या. याचा शेवट हा राष्ट्रीय शिक्षण मंडळ संचलित आयुर्वेद रसशाळा येथील फील्ड विजिटने झाला.वैद्य सुहास कुलकर्णी सरांनी उत्तम मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनीही उत्तम प्रतिसाद दिला.

अशा प्रकारे खूप उत्साहात व सर्वांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या उत्तम प्रतिसादाने हा पंधरा दिवसीय transitional curriculum यशस्वीपणे पार पडला.नक्कीच विद्यार्थ्यांना ह्यातून दिशा मिळाली असावी व त्यांच्या मनात नवी अशी ची पालवी व उत्तम चिकित्सक होण्याची प्रेरणा मिळाली असेल अशी आशा.